| **Headline:** Limaye takes charge | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 18 July 2017 |

# विक्रम लिमयेंनी स्वीकारली सूत्रे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



विक्रम लिमये

राष्ट्रीय शेअर बाजाराची (एनएसई) विस्कळित झालेली प्रक्रिया, अंतर्गत कारभारात आलेली बेशिस्त आणि अनियमितता यांच्याशी नवे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) व व्यवस्थापकीय संचालक (एमडी) विक्रम लिमये यांना सामना करावा लागणार आहे. विक्रम लिमये यांची निवड झाल्यापासून त्यांनी सोमवारी प्रत्यक्ष पदभार स्वीकारेपर्यंत पाच महिन्यांचा कालावधी गेला आहे. या पाच महिन्यांत राष्ट्रीय शेअर बाजारापुढील संकटांमध्ये वाढ झाली आहे.

कॅश मार्केट्स व करन्सी डेरिव्हेटिव्ह संदर्भात झालेल्या अनियमिततांबाबत अर्न्स्ट अँड यंग न्यायवैद्यक परीक्षण करत आहे. त्याचप्रमाणे इक्विटी डेरिव्हेटिव्ह सुविधेचे न्यायवैद्यक परीक्षण डेलॉइट करत आहे. ही दोन्ही परीक्षणे अद्याप पूर्ण होणे बाकी आहे. एनएसईच्या को-लोकेशनचा प्रश्न सोडवणे आणि भांडवल बाजार नियामकाशी संवाद पुन्हा प्रस्थापित करणे याला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे लिमये यांनी सांगितले.

एनएसई सध्या कठीण काळातून जात असले तरी लवकरच आपण यातून बाहेर पडू, असा विश्वास विक्रम लिमये यांनी एनएसईच्या सर्व कर्मचाऱ्यांना दिला आहे.

## एनएसईतील आव्हाने

- सेबीकडून एनएसई व त्याच्या १४ अधिकाऱ्यांना अयोग्य ॲक्सेस विरोधात कारणे दाखवा नोटीस.
- गेल्या आठवड्यात एनएसईचे तीन तास बंद पडलेले कामकाज.
- वादात सापडलेला एनएसईचा आयपीओ.
- घसरलेली विश्वासार्हता.